पुण्य नगरी
SMART नाशिक
शहर । रविवार, १२ जानेवारी २०२०

राज एजन्सीज्
फुलंब्री, जि. औरंगाबाद
SWARAJ 8100 Ex
Harvester



संपर्क-9341090909
9730715809

## In Short

### टाकळी रोडला एकाची आत्महत्या

नाशिक : टाकळी रोड भागातील खोडदेनगर येथील एकाने गळफास घेत आत्महत्या केली. या इसमाच्या आत्महत्येचे कारण समजू शकले नाही. याप्रकरणी उपनगर पोलीस ठाण्यात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. राजेंद्र दौलतराव कुमावत (वय ४९, रा. इच्छापूर्ती मंदिरासमोर, खोडदेनगर) असे आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीचे नाव आहे. कुमावत यांनी शुक्रवारी (दि.१०) दुपारी आपल्या राहत्या घरात पंख्याला साडी बांधून गळफास लावून घेतला होता. त्यात त्यांचा मृत्यू झाला. अधिक तपास जमादार परदेशी करीत आहेत.

### कॉलेज आवारातून दुचाकी चोरी

नाशिक : महाविद्यालयाच्या आवारात पार्क केलेली दुचाकी चोरट्यांनी पळवून नेल्याची घटना महामार्गावरील के. के. वाघ महाविद्यालयात घडली. याप्रकरणी आडगाव पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



प्रज्वल रायते (रा. उंबरखेड रोड, पिंपळगाव ब.) या विद्यार्थ्याने याप्रकरणी तक्रार दाखल केली आहे. रायते गेल्या शनिवारी (दि.४) नेहमीप्रमाणे कॉलेजला आला होता. आवारातील दुचाकी पार्किंगमध्ये त्याने एफ. झेड. (एमएच १५ जीझेड ५१३२) पार्क केली असता चोरट्यांनी चोरून नेली. अधिक तपास हवालदार

# समाजकार्यासाठी नाशिककरांची उत्स्फूर्त धाव !

**नाशिक : हातात तिरंगी झेंडे, रंगीबेरंगी फुगे आणि अंगात पिवळा धमक टी शर्ट घालत समस्त नाशिककरांनी नाशिक रनमध्ये सहभागी होत समाजाच्या भल्यासाठी होत असलेल्या कार्यास आपला खारीचा वाटा उचलला. सकाळी निघालेल्या या नाशिक रनला दहा हजारच्या वर संख्येने हजेरी लावत अनाथ, दिव्यांग, आदिवासी, तसेच शेतकरी व महिलांच्या उत्थानासाठी काम करणाऱ्या या संस्थेच्या पाठीशी आहोत, हे नाशिककरांनी दाखवून दिले.**



महात्मानगर मैदानापासून सकाळी साडेसहा वाजता विविध वयोगटांतून दहा किमी अंतराच्या स्पर्धेस प्रारंभ झाला. ही मॅरेथॉन महात्मानगर क्रीडांगण, जेहान सर्कल, पाटील लॉन्स, सोमेश्वर व परत जेहान सर्कल व महात्मानगर क्रीडांगण अशी १० किलोमीटर अंतराची होती. विशेष म्हणजे नाशिकचे पोलीस आयुक्त विश्वास नांगरे-पाटील हे सुद्धा धावण्यासाठी सहभागी झाले होते. त्यानंतर झालेल्या नाशिक रनच्या मुख्य कार्यक्रमास नाशिक रनचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. सकाळी ८ वाजता खऱ्या अर्थाने नाशिक रनला सुरुवात झाली. घरकुल परिवारातील विशेष विद्यार्थिनी आदिती जाधव हिच्या हस्ते नाशिक रनचे ध्वजारोहण झाले. यावेळी महापौर सतीश कुलकर्णी, नाशिक रनचे एन. बालकृष्णन, सौमित भट्टाचार्य, हरीशंकर बॅनर्जी, जॉन ऑलिव्हर, व्यंकटेश, राजू गाढवे, संजय मोदी, अशोक पाटील, अनंत राजन, अनिल दैठणकर, बी. रमेश, अजय गोसावी, चंद्रिका भगत, पंकज गाडेकर, आदित्य हिंगणे आदी उपस्थित होते.

**स्पर्धेतील विजेते** : १० किलोमीटर –१५ ते ३५ वय, महिला– १)योगिता वाघ २) दिशा बोरसे ३) निवृत्ता धवड. ३६ ते ५० वर्षे– महिला १) अश्विनी देवरे २) नितू सिंग ३) नीता नारंग. ५१ ते ९९ महिला १) सुचिता पालवे, २) कल्पना कुशारे ३)रेवती चिटको. पुरुष १५ ते ३५ वयोगट १) रोहित यादव २)सुनीत कुमार ३)रवी कुमार. ३६ ते ५० वर्षे १) सावळीराम शिंदे, २) संतोष वाघ, ३)नंदू उगले. ५१ ते ९९ वर्षे १) हरीश चंद्र, २) वसंतराव कचरू ३) दिनकर शेळके.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला नाशिक रनचे विशेष ब्रॅण्ड ॲम्बेसेडर बनलेले आयर्न मॅन किशोर घुमरे, महेंद्र छोरिया, प्रशांत डबरी, डॉ.अरुण गटले यांनी मैदानाला चक्कर ▶▶ पान ४ वर






(छायाचित्रे : गणेश खिरकाडे)

Scanned by CamScanner

# समाजकार्यासाठी नाशिककरांची उत्स्फूर्त धाव!

मारीत मशाल हाती धरत दीप प्रज्वलन केले. यावेळी नाशिक सायकलिस्टचे डॉ. महेंद्र महाजन, डॉ. हितेंद्र महाजन, डॉ. मनीषा रौंदळ, अनिरुद्ध अथनी, अश्विनी देवरे आदी उपस्थित होते. तोलानी डान्स अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी हिंदी व इंग्रजी गीतांच्या तालावर झुम्बा डान्स करीत उपस्थित धावकांना वॉर्म अप केले. यावेळी विविध गीतांवर नाशिककर बेभान नृत्य करताना दिसत होते. या वॉर्म अपमुळे सकाळची कडाक्याची थंडीचा फिल धावकांना झाला. महात्मानगर मैदानापासून जेहान सर्कल, नंदन स्वीट्स, रॉकेट सर्कल, पारिजातनगर व पुन्हा महात्मानगर मैदान अशी छोटेखानी रन नाशिककरांनी पूर्ण करीत समाजासाठी होत असलेल्या आर्थिक मदतीसाठी आपलाही सहभाग घेतला. सकाळी छोट्या छोट्या गटाने धावकांचा समूह धावण्यासाठी सोडला जात होता. शलाका भेंडे व नकुल संघवी यांनी आपल्या खास खुमासदार शैलीत या सर्व कार्यक्रमांचे सूत्रसंचालन केले.

Scanned by CamScanner